# काँग्रेस - आप मधील जुगलबंदी

अरुण जेटली

विरोधी पक्षनेते, राज्यसभा

काँग्रेस - आप मधील जुगलबंदी कशा प्रकारची आहे? सर्वजण आपला काँग्रेसची बी टीम असल्याचे म्हणत आहेत. पण हकीकत त्यपेक्षा काही वेगळी आहे. सद्ध्या काँग्रेस आप ची बी टीम असल्याप्रमाणे काम करण्यास सहमत आहे. या दोघांच्या सबंधाबद्दल आणि गुणवत्तेबाबत अनेक प्रकारची टीका पण होत आहे.

दिल्लीत सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपने मात्र ३२ जागा मिळवल्या आहेत. ३६ सदस्य नसतील तोपर्यंत सरकार बनवू शकत नाहीत त्यामुळे आमची स्थिती स्पष्ट होती. भाजपने या आकड्याची वास्तविक माहिती राज्यपालांना दिली आणि सांगितले होते की भाजप विरोधी पक्षात बसेल किंवा पुन्हा निवडणूक लढवण्यास तयार आहे.

आप ने मात्र २८ जागाच मिळविल्या होत्या. हा आकडा सरकार बनविण्यासाठी जरुरी असलेल्या जादूच्या आकड्यापेक्षा कमी होता. आप ला दिल्लीत सरकार बनवून राष्ट्रीय स्तरावर येण्याचा लोभ होता. त्यांनी काँग्रेस चा पाठींबा घेऊन हा हेतू पार पडला.

काँग्रेस पक्षाला स्पष्टपणे निवडणुकीत पराजयाचा सामना करावा लागला. त्यांना फक्त ८ जागा मिळाल्या. त्यांचे महत्त्वाचे नेते निवडणूक हरले. काँग्रेस पुन्हा निवडणूक आणण्याच्या मनस्थितीत नाही आहे. कोणत्याही प्रकारे कोन्ग्रेसला दिल्लीत सरकार बनवायची होती. तसेच मोदी परीबळ सुद्धा निवडणुकीवर परिणाम करू शकतो. भाजप आणि आप दरम्यान ध्रुवीकरण होऊ शकते.

दोन विरोधाभासी पक्षाने हात मिळविले. सरकारची रचना करण्यासाठी आप ला काँग्रेस च्या ८ सदस्यांचा पाठींबा जरुरी आहे. सरकार स्तप्नेने त्यांच्या सदस्यांना आधार मिळाला. देशाच्या राजधानीत सरकारची स्थापना त्यांना राष्ट्रीय स्तरावर सक्रीय करील. अशी सरकार कायम राहू शकत नाही ते सर्व जाणतात. काँग्रेस ला बदनाम करणारे आता त्यांचाच आधार घेत आहेत.काँग्रेस इतर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा अपमान सहन करत आहे. काँग्रेस आणि आप साठी हे राजकीय समाधान आहे. काँग्रेस त्यांची मतदार क्षेत्रात पुन्हा वर्चस्व स्थापन करण्याच्या प्रयत्नात आहे. ज्यामुळे आप

बरोबर त्यांची जुगलबंदी किती वेळ चालू शकेल ते सर्वांना माहित आहे. देशाच्या राजधानीत सरकारची स्थापना त्यांना राष्ट्रीय स्तरावर सक्रीय होण्याचा लोभ आहे. संयुक्त रित्या विधानसभेची बहुमती घेणाऱ्या दोन पक्षांना एका लज्जास्पद हेतू साठी सरकार बनविण्याची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे त्यांचे शासन दिल्लीकरांसाठी अल्पमुदतीचे ठरणार नाही म्हणजे झाले.